मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शिरुरमध्ये डॉ. अमोल कोल्हे आघाडीचे उमेदवार

## आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हेच असणार : जयंत पाटील

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**




शिरुर लोकसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे हेच असणार आहेत, अशी घोषणा राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पदाधिकाऱ्यांची मेळाव्यात गुरुवारी (ता. ८) मोशी येथे केली. लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने भोसरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांचा विजय संकल्प दिवस मेळावा मोशी येथे आयोजित केला होता. यावेळी जयंत पाटील यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना खासदार कोल्हे हेच उमेदवार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, नेते प्रकाश म्हस्के, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, विकास लवांडे, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा धर-शिलवंत, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, प्रवक्ते माधव पाटील आदी उपस्थित होते. जयंत पाटील यांनी भोसरी विधानसभा विभागातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. शिरुर लोकसभेत पुन्हा एकदा आपल्याला कोल्हे यांना खासदार म्हणून दिल्लीत पाठवायचे आहे. त्यासाठी भोसरी विधानसभेत सर्वांनी एकजुटीने काम करावे. ताकदीनिशी काम करून पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. बुथ समित्या सक्षम करण्यावर सर्वांनी भर देण्याचे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले. यावेळी इम्रान शेख यांनी ४६४ बुथ समित्यांची बांधणी करण्याची जबाबदारी घेण्याबाबत सुतोवाच केले. त्यावर जयंत पाटील यांनी शडराध्यक्ष कामठे व इम्रान शेख यांना महिला, युवक सर्वांना बरोबर घेऊन येत्या १५ दिवसात बुथ समित्या बांधण्याची सूचना केली. भोसरी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष ज्ञानेश्वर आल्हाट यांनी प्रास्तविक केले. माणिक जैद पाटील यांनी सूत्रसंचलन केले व अरुण थोपटे यांनी आभार मानले. शरदचंद्र पवार नावाची सर्वांनाच भीती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्हाच्या बाबतीत जो निर्णय व्हायचा तो झालेला आहे. परंतु; निवडणूक आयोगाने आपल्याला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार' हे नाव दिले आहे. आता नावाला देखील काही जणांनी विरोध सुरू केला आहे. कारण, आता शरदचंद्र पवार हे नाव पक्षासोबत असल्यामुळे सर्वांना खरा आणि शरद पवार यांच्या विचारांचा पक्ष कोणता, हे सर्वांना समजणार आहे. त्याचीच भीती त्या सर्वांना आहे, असेही यावेळी जयंत पाटील म्हटल्याचे पदाधिकाऱ्यांना सांगितले.

# नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व अजित पवार यांना उशिरा मान्य झाले

## माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे मत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**




नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व हे आम्हाला मान्य झाले म्हणून आम्ही २०१९ ला भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. अजित पवार यांना ते उशिरा मान्य झाले. त्यामुळे जे जे कोणी महायुतीमध्ये येतील त्यांचे स्वागत आहे. पण; ते आल्यामुळे कोणतीही अडचण नाही, असे मत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी बुधवारी (ता. ७) पत्रकारांशी बोलताना मांडले. अजित पवार यांनी महायुतीमध्ये प्रवेश केल्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत इंदापूर विधानसभा मतदारसंघाची जागा कोणाकडे जाणार यावर सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. याविषयी पत्रकारांनी विचारले असता पाटील म्हणाले, 'जागावाटपाचा निर्णय हा सर्वस्वी वरिष्ठांचा असेल.' 'लोकसभेच्या संदर्भातील सगळे निर्णय राष्ट्रीय स्तरावर होतात. महायुतीतील ४८ जागांपैकी प्रत्येक पक्षाला किती जागा द्यायच्या यावर राज्यातले व राष्ट्रीय स्तरावरील नेते बसून निर्णय घेतील. सध्या प्रत्येक विधानसभा व लोकसभा मतदार संघाचा अभ्यास सुरु आहे. जागावाटप झाल्यानंतरच उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता लक्षात घेऊन कोणत्या जागी कोणता उमेदवार द्यायचा हा निर्णय होईल. असे त्यांनी सांगितले. अजित पवार गटाला चिन्ह देण्याचे हर्षवर्धन पाटील यांनी केले स्वागत राष्ट्रवादी पक्षाचे नाव व चिन्ह हे अजित पवार गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे मी स्वागत करतो. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत याचा आम्हाला फायदाच होईल. नरेंद्र मोदी यांची तिसऱ्या वेळी पंतप्रधान म्हणून निवड होईल.', असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

# बिल्डरांसाठी गृहप्रकल्प मस्त; नागरिक त्रस्त!

## रस्त्यावरील राडारोड्याने अन् अवेळी होणाऱ्या कामामुळे नागरिक त्रस्त

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्राधिकरणातील सेक्टर ९ मध्ये बांधकाम व्यावसायिकांनी गृहप्रकल्प सुरु केले आहेत. नियमांच्या बाहेर कामकाज सुरु ठेवले जाते, फूटपाथावर पत्राशेड उभारलेले असून, रस्त्यांवर बांधकामाचा राडारोडा पडल्याने परिसरातील नागरिकांना ये-जा करण्यास त्रास होतोय. धुळीचा त्रास, अवेळी होणाऱ्या ठाकठूकीच्या आवाजाने नागरिक त्रस्त झाले आहे. महापालिकेने याबाबत कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.मोशी प्राधिकरणातील सेक्टर नऊ मधील नागरिक आरटीओच्या गाड्यांमुळे आधीच त्रस्त आहेत. त्यामध्ये परिसरात तीन ते चार गृहप्रकल्प सुरु असून, अवेळी चालणाऱ्या कामकाजामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.



सकाळी कधी कधी सहा वाजता काम सुरु होते. तर रात्री कधी कधी आठ वाजता सुरु असते. महापालिकेने कामकाजाबाबतचे काही नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमांना वाटाण्याच्या अक्षता दिल्या जात आहेत. रस्त्यावर आलेल्या बारीक खडीच्या कणांमुळे दुचाकी घसरून पडण्याची शक्यता आहे. तसेच लोखंड, खडी, वाळू रस्त्यावर आल्याने नागरिकांना ये-जा करण्यास अडचणी येत आहेत. गृहप्रकल्पामध्ये साहित्य टाकण्यास जागा अपुरी असल्याने रस्त्याच्या कडेला साहित्य तात्पुरत्या स्वरूपात टाकले असल्याचे बांधकाम व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे.

> **कुठलाही गृहप्रकल्प सुरु असताना, आजुबाजूच्या नागरिकांना नाहक त्रास झाला नाही पाहिजे. महापालिकेने दिलेल्या नियमांचे पालन झाले पाहिजे. रस्त्यावर राडारोडा टाकला असेल आणि अवेळी कामकाज केले जात असेल तर योग्य ती कारवाई करू.**
>
> **-मकरंद निकम, शहर अभियंता**

> **रस्त्याच्या कडेला थोड्याफार प्रमाणातच राडारोडा आहे. अवेळी आमचे काम सुरु नसते. महापालिकेच्या नियमाचे उल्लंघन केले जात नाही. फक्त खडी, लोखंड टाकण्यासाठी आत जागा नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला साहित्य टाकले आहे.**
>
> **- हितेश पटेल, बांधकाम व्यावसायिक**



> **बांधकाम व्यावसायिकांकडून महापालिकेच्या नियमांचे पालन केले जात नाही. परिसरात नोकरदार, व्यावसायिक असा सर्व वर्ग राहतो. कामावरून घरी आल्यानंतर प्रत्येकास शांतता पाहिजे असते, मात्र रात्रीच्या वेळी सकाळी सहा वाजता ही ठाकठूक आवाजाने नागरिकांना त्रास होतो. रस्त्यावरील राडारोडा बांधकाम व्यावसायिकाची जबाबदारी असते, त्याचा त्रास परिसरातील नागरिकांच सहन करावा लागतोय.**
>
> **-निखिल काळकुटे, सामाजिक कार्यकर्ते**



> **बांधकाम व्यावसायिकांना वारंवार सांगूनही तसेच महापालिका सारथीवर तक्रार करूनही नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष केले जात आहे. सेक्टर नऊ मध्ये रस्त्यावर बांधकामाचा राडारोडा पडलेला आहे. स्टीलचे कटींग रस्त्यावर केले जाते. फूटपाथावर पूर्ण अतिक्रमण केले आहे. बांधकामाच्या धूळीमुळे लहान मुलांना आणि अबालवृद्धांना अधिक त्रास होतो आहे. सकाळी आणि रात्री काम करताना वेळ पाळली जात नाही.**
>
> **-दत्तात्रय सुक्रे, नागरिक**

# आगाऊ कर भरल्यास सवलत; स्थायी समितीने कर दर केले निश्चित

## स्थायी समिती सभागृहात प्रशासक सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी कर व करेत्तर बाबींचे दर निश्चित करणे, नवीन मिळकतीच्या संपूर्ण कराची आगाऊ रक्कम भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात सवलत देण्यासाठी महापालिका सभेकडे शिफारस करण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

महापालिका भवनातील स्थायी समिती सभागृहात प्रशासक सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप आदी उपस्थित होते. कासारवाडी मैला शुद्धीकरण केंद्रांतर्गत वार्षिक ठेकेदारी पद्धतीने दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी परिसर व उर्वरित भागामध्ये ड्रेनेज लाईनची व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती




करणे, 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दत्तवाडी, विठ्ठलवाडी परिसरात तसेच कासारवाडी मैला शुद्धीकरण केंद्रांतर्गत प्रभाग २ व ६ मध्ये आणि पिंपळे सौदागर, विश्वशांती कॉलनी, काटेवस्ती, गावठाण परिसरात, पिंपळे निलख, विशालनगर, कस्पटेवस्ती, वेणूनगर, दत्त मंदीर, रहाटणी, रामनगर, शिवराजनगर येथील जलःनिसारण नलिका व मॅनहोल चेंबर्सची दुरुस्ती व देखभालज्ञखर्चास मान्यता दिली.अन्य मंजूर विषय- चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, किवळे, विकासनगर, दत्तनगर, बापदेवनगर, आदर्शनगर, मामुर्डी, साईनगर, आदर्शनगर, आझादनगर परिसरातील जुन्या जलनि:सारण नलिका बदलणे व ड्रेनेज लाईन्स व चेंबर्सची दुरुस्ती करणे - कासारवाडी - गेटाखालील रस्त्याची दुरुस्ती करणे - निगडी प्राधिकरण सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात महावितरण कंपनीस उच्च दाब वीजभार वाढवणे - पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणाऱ्या १८ मीटर डीपी - रावेत येथील मुख्य जलवाहिनीस अडथळा करणाऱ्या २२ केव्ही भूमिगत केबल बदलणे - मेट्रो प्रकल्पांतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसवणे.

# पुण्यात लवकरच स्कायबस : फडणवीस

## सेवा विधेयकातील तरतुदीनुसार निधी देण्यासाठी पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
हिंजवडीतील आयटी पार्क आणि औद्योगिक भागातील आस्थापनांपर्यंत पोहोचण्यासाठी स्कायबस हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे मेट्रोला पूरक सेवाही मिळणार आहे. या प्रकल्पाच्या परवानगीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, लवकरच त्याचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे गुरुवारी दिली. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सर्व प्रश्न सोडविले जातील आणि वस्तू आणि सेवा विधेयकातील तरतुदीनुसार निधी देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल. त्यासाठी बैठक घेतली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन



फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी झाले. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, माजी खासदार संजय काकडे या वेळी उपस्थित होते. राज्यात पाच वर्षे भाजपचे राज्य होते. त्या वेळी पुणे शहराचे चित्र आणि चेहरा बदलण्याचे काम करण्यात आले. विविध प्रकारच्या विकास योजना, राज्य, केंद्र आणि महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सर्वाधिक विजेवर धावणाऱ्या गाड्या असून, देशपातळीवर या प्रारूपाचा गौरव करण्यात आला असून, ते देशातील अनेक राज्यांनी, शहरांनी स्वीकारले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.ते म्हणाले, की शहरात मेट्रोचे काम वेगाने प्रगतिपथावर आहे. मेट्रोच्या भुयारी मार्गाची चाचणीही झाली असून, येत्या काही दिवसांत शहरातील तिन्ही मेट्रो मार्गिका पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहेत. शहरात ५५ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्गिकांचे जाळे निर्माण केले जाणार आहे. मेट्रो सेवेला पूरक सेवा म्हणून स्कायबसचा प्रयोगही राबविण्यात येणार आहे. विशेषत: हिंजवडीसारख्या औद्योगिक क्षेत्रात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेपर्यंत वेळेत पोहोचणे शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी परवानगी घेण्यासाठीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची वेळ घेऊन त्याचे लवकरच भूमिपूजन केले जाईल. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत जाणारा वर्तुळाकार मार्ग हा शहराच्या विकासासाठी नवी संधी आहे. या वर्तुळाकार मार्गासाठी ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून वर्तुळाकार मार्गामुळे अडीच लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था पुण्यात निर्माण होणार आहे. त्यामुळे हा मार्ग इकॉनॉमिकल कॉरिडॉर ठरणार आहे. याशिवाय मिसिंग लिंकमुळे पुणे आणि मुंबई शहरातील अंतर कमी होणार आहे. देशातील भविष्यातील शहर म्हणून पुण्याकडे पाहिले जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन करावे लागणार असून, त्यासाठी विविध योजना राबविण्याचे नियोजित आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, माजी खासदार संजय काकडे या वेळी उपस्थित होते. राज्यात पाच वर्षे भाजपचे राज्य होते. त्या वेळी पुणे शहराचे चित्र आणि चेहरा बदलण्याचे काम करण्यात आले. विविध प्रकारच्या विकास योजना, राज्य, केंद्र आणि महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सर्वाधिक विजेवर धावणाऱ्या गाड्या असून, देशपातळीवर या प्रारूपाचा गौरव करण्यात आला असून, ते देशातील अनेक राज्यांनी, शहरांनी स्वीकारले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

# पुणे विमानतळावर मागील काही वर्षांत प्रवाशांची गर्दी

## खासदार बारणे यांच्या हिंदीतील प्रश्नावर सिंधिया मराठीत उत्तर

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे विमानतळावर मागील काही वर्षांत प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या विमानतळावर भारतीय वायु सेनेच्या विमानांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोईसाठी जिल्ह्यातील इतर ठिकाणी विमानतळ उभारण्याचे नियोजन केले आहे का? असा प्रश्न मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी हिंदीतून लोकसभेत विचारला. त्यावर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मराठीत उत्तर दिले.खासदार बारणे म्हणाले की, पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्हा परिसराची लोकसंख्या दोन कोटीवर पोहोचली आहे. पुणे शैक्षणिक, व्यवसायिक, माहिती व तंत्रज्ञाननगरी असून देश-विदेशातून प्रवाशी विमानाने पुण्यात येतात. विमानतळावरून आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हवाई वाहतूक सुरू आहे. विमानतळावर प्रवाशांची संख्या मोठी



असून हे विमानतळ देशातील दहाव्या क्रमांकाचे आहे. हे विमानतळ भारतीय वायुसेनेचे मुख्य बेस आहे. त्यामुळे वायुसेनेच्या वेळापत्रकानुसार चालविले जाते. परिणामी, भारतीय वायू सेनेच्या विमानांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोईसाठी जिल्ह्यातील इतर ठिकाणी विमानतळ उभारण्याचे नियोजन आहे का?त्यावर मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया मराठीत उत्तर देत म्हणाले, मी मराठी माणूस आहे. पुण्याची वृद्धी आणि पुण्याचा विकास करण्याचा माझा संकल्प आहे. पुणे विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. दोन ते तीन आठवड्यात नियोजन करून टर्मिनलचे उद्घाटन केले जाईल. दुसऱ्या विमानतळाबाबत राज्य सरकारशी चर्चा करावी. त्यासाठी राज्य सरकारने जागा पाहणी करून आम्हाला अहवाल पाठवावा, त्यावर आम्ही कार्यवाही केली जाईल. सद्यस्थितीत एका जागेबाबत प्रस्ताव आमच्याकडे आला होता.मात्र, शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत. त्यामुळे जागा पाहून प्रस्ताव पाठविण्याची राज्य सरकारची जबाबदारी आहे. प्रस्ताव आल्यास योग्य कारवाई केली जाईल.असा प्रश्न मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी हिंदीतून लोकसभेत विचारला. त्यावर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मराठीत उत्तर दिले.

# मुख्यमंत्र्यांबरोबर कोणी छायाचित्र काढल्यास त्यांना कसे जबाबदार धरता

## लोकांमध्ये मिसळून, रस्त्यावर उतरून ते काम करतात : उदय सामंत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे लोकांमधील मुख्यमंत्री आहेत. लोकांमध्ये मिसळून, रस्त्यावर उतरून ते काम करतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांबरोबर कोणी छायाचित्र काढल्यास त्यांना कसे जबाबदार धरता येईल, असा सवाल उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला. जे लोक कधी बंगल्याच्या बाहेर आले नाहीत. त्यांना दुसऱ्यांबरोबर छायाचित्र काढणे हे माहीत नसावे, असा टोला सामंत यांनी खासदार संजय राऊत यांना लगाविला. पुणे इंटरनॅशनल प्रदर्शन



आणि कन्व्हेन्शन सेंटर यांच्यावतीने १७ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत मोशी येथे होणाऱ्या निर्यातक्षम संरक्षण सामग्री प्रदर्शन (महाराष्ट्र एमएसएमइ डिफेन्स एक्स्पो) पूर्वतयारीचा सामंत यांनी वाकड येथे आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.खासदार संजय राऊत हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गुन्हेगारांसोबतचे छायाचित्र समाजमाध्यमावर प्रसारित करत आहेत. याबाबत बोलताना मंत्री सामंत म्हणाले, सध्या प्रत्येकाच्या हातात मोबाईल संच आहे. राजकीय नेत्यांसोबत छायाचित्र काढण्याची सर्वांची इच्छा असते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लोकांमधले असून कोणीही छायाचित्र काढल्यास त्यांना कसे जबाबदार धरता येईल. महाराष्ट्रातील एकही प्रकल्प गुजरातला गेलेला नाही. काही लोक नकारात्मक वातावरण तयार करण्यात यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. तीन लाख ३० हजार कोटींचे करार दावोसमध्ये केले असून परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात आणली आहे. पवना, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प तीन हजार कोटी रुपयांचा आहे. उगमापासून शेवटपर्यंत नदी स्वच्छ केली जाणार आहे. औद्योगिक, नागरी भागातील मैलापाणी बंद करणे, नदीतील गाळ, घाण, कचरा, जलपर्णी कशी काढली जाईल. यावर आराखडा तयार केला जाणार आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.

### उद्योगांच्या विकासाला चालना’

» पुणे इंटरनॅशनल प्रदर्शन आणि कनव्हेन्शन सेंटर यांच्यावतीने आयोजित प्रदर्शनाला राज्यातील लघु व मध्यम उद्योजक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या प्रदर्शनामध्ये ४६ गाळे लावण्यात येणार असून आतापर्यंत ३०० उद्योजकांनी सहभागी होण्यासाठी नोंदणी केली आहे. संरक्षण उत्पादनासाठी महाराष्ट्र एक प्रमुख केंद्र बनवण्यासाठी शासन वचनबद्ध आहे. या प्रदर्शनामुळे लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाला चालना मिळेल, असेही सामंत म्हणाले.

# गुगलने एआयमध्ये मोठ्या प्रमाणात काम केलंय : फडणवीस

## हीच शक्ती महाराष्ट्रात कशी वापरता येईल यासंदर्भातील हा करार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तामुळे जगभरात विविध क्षेत्रात क्रांती झाली आहे. संगणक क्रांतीनंतर ‘एआय’मुळे जवळपास प्रत्येक कामाच्या स्वरूपांमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. याचाच वापर आता सरकार त्यांच्या प्रशासकीय कामात करणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सरकारचा गुगलबरोबर करारही आज झाला. या करारामुळे महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात आता




एआयचा सक्षमपणे वापर केला जाणार आहे. परंतु, एआयच्या वापरामुळे महाराष्ट्रातील रोजगार संपुष्टात येणार का? एआयमुळे किती रोजगार जाणार याबाबत मोठा प्रश्न निर्माण झालाय. या प्रश्नांवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. ते आज पुण्यात माध्यमांशी बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुगल एक अत्यंत महत्वाची टेक्नोलॉजी कंपनी आहे. या कंपनीचा जगभरात प्रचंड मोठा विस्तार आहे. टेक्नोलॉजीच्या क्षेत्रात ही कंपनी एक पाऊल पुढे राहिली आहे. गुगलने एआयमध्ये मोठ्या प्रमाणात काम केलंय. त्यामुळे त्यांनी लोकोपयोगी एआय विचार मांडला आहे. त्यांची हीच शक्ती महाराष्ट्रात कशी वापरता येईल यासंदर्भातील हा करार आहे.शेती, सस्टेनेबिलिटी, स्टार्टअप, हेल्थकेअर, कौशल्य आदी विविध क्षेत्रात आम्ही (सरकार आणि गुगल) एकत्र काम करणार आहोत. एआयमुळे लोकांचं जीवन बदलू शकतं, प्रशासकीय कामात सुधारणा होऊ शकते. काही ॲप्स त्यांनी दाखवले. त्यानुसार शेतकऱ्याच्या जमिनीत काय पिकवलं पाहिजे, त्याची वाढ कशी झालीय याचं मॉनिटरिंग आणि डेटा मिळू शकतो. या मोबाईल ॲपवरून शेतकऱ्याने काय वापरलं पाहिजे, त्यावर कोणती किड येऊ शकते हे शेतकरी जाणून घेऊ शकतो. असे अनेक ॲप आहेत, असं उदाहरणही त्यांनी दिलं.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एआयसंदर्भातील माहिती देत असताना पत्रकारांनी रोजगारासंदर्भात प्रश्न विचारला. या कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे अनेक रोजगार जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर झाल्यास किती रोजगारांवर गदा येईल, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले.